दैनिक
# जनसंजीवनी
वर्ष १ ले
विश्वास तुमचा, साथ आमची
गुरुवार दि. १५/०९/२०२२
मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगर
संस्थापक : मनीष एस. जाधव | Code No. : MAHMAR51729 | ९८२३७५२९६४ | पाने : ४ | अंक : १४८ | Gmail : editor.jansanjivani@gmail.com | किंमत : ३.०० रूपये



TUTIONS CLASSES
For 1st - 5th Class All Subjects
Cursive Writing Classes also Available
Improve Your Basic Concepts
LEARN WITH TECHNIQUES
Contact us - Swapna M. Jadhav 8483872964


## बंद असलेली दस्तनोंदणी सुरू करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेऊ

### महसूलमंत्री आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दस्तनोंदणी संदर्भात बैठक संपन्न

मुंबई प्रतिनिधी – राज्यात तुकडेबंदी व ग्राम पंचायत हद्दीतील सदनिकांची दस्तनोंदणी बंद असून त्यामुळे सर्वसामान्य सदनिकाधारकांना अडचणी येत आहेत. अशा तक्रारी प्राप्त होत आहेत. यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे सांगून सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी गुंठेवारीतील जाचक अटी दूर होईपर्यंत दस्तनोंदणी त्वरित सुरु करण्याबाबत विभागाने त्वरित प्रस्ताव सादर करावा आशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

आज मंत्रालयात महसूल मंत्री विखे पाटील आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला महसूल विभागाचे प्रधान सचिव नितीन करीर, नोंदणी महानिरीक्षक श्रावण हर्डीकर महसूल व नोंदणी खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ मधील कलम ४४/१ (ळ) याला उच्च न्यायालयाने कोणत्याही प्रकारची स्थगिती दिली नसल्याने याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देऊन लवकरच दस्तनोंदणी सुरु होईल असे विश्वास दोन्ही यावेळी दिले. सर्वसामान्यांना कायम स्वरूपी दिलासा मिळावा, यासाठी पुढील अधिवेशनात कायद्यात बदल करता येईल का यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच सन २००१ च्या गुंठेवारी कायद्याला मुदतवाढ देताना त्यात जाचक अटी घालण्यात आल्या व दंडाची रक्कम ही अवाजवी आकरण्यात येत असल्यामुळे मनपा किंवा पीएमआरडीए हद्दीत गुंठेवारीच्या अत्यल्प प्रकरणे प्राप्त झाली. त्यामुळे यात ही सुधारणा करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल आणि याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असेही या बैठकीत सांगितले.

## 'महाराष्ट्र केसरी'चा थरार रंगणार वर्षाअखेरीस

### संयोजक मुरलीधर मोहोळ यांची माहिती; ९०० कुस्तीगीर होणार सहभागी

पुणे प्रतिनिधी – महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठेची आणि कुस्तीचा कुंभमेळा असणाऱ्या 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धेचा थरार वर्षाखेरीस डिसेंबरमध्ये रंगणार आहे. यंदा या स्पर्धेच्या आयोजनाची संधी संस्कृती प्रतिष्ठानला मिळाली असल्याचा आनंद असून, कोथरूडमध्ये ही स्पर्धा भव्य स्वरूपात करण्याचा मानस आहे, अशी माहिती 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धेचे मुख्य संयोजक व संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी माजी खासदार अशोक मोहोळ, पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. हनुमंत गावडे, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. संदीप भोंडवे, पुणे शहर राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष पै. योगेश दोडके, पुणे शहर राष्ट्रीय तालीम संघाचे विश्वस्त पै. तात्यासाहेब भिंताडे, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष विलास कथुरे आणि पदाधिकारी, कुस्तीगीर आदी उपस्थित होते.मुरलीधर मोहोळ म्हणाले, ''स्व. मामासाहेब मोहोळ यांच्या संकल्पनेतून आणि दूरदर्शी विचारातून 'महाराष्ट्र केसरी' ही स्पर्धा सुरु झाली आणि आज मोठ्या शिखरावर पोहोचली. त्याच आम्हा मोहोळ कुटुंबियांकडे या स्पर्धेची जबाबदारी आली, ही निखळ समाधान देणारी बाब आहे. ज्या मामासाहेब मोहोळ यांनी या स्पर्धेची मुहूर्तमेढ रोवली, त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा, उजाळा देणारी ही स्पर्धा ठरेल. काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अस्थायी समितीचे अध्यक्ष संजय सिंग यांच्याकडून महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या आयोजनाचे पत्र स्विकारले आहे. संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने वर्षाअखेरीस या कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे. कुस्ती क्षेत्रातील मान्यवर, तसेच कुस्तीप्रेमींना निमंत्रित करण्यात येणार आहे.''




''सलग सहा दिवस या स्पर्धेचा थरार रंगणार असून, राज्यभरातील मल्ल एकमेकांशी दोन हात जाणार आहेत. ३३ जिल्ह्यातील आणि ११ महापालिकामधील ४५ तालीम संघातील ९०० मल्ल या स्पर्धेत सहभागी होत आहेत. यासह नामांकित ४० मल्लही सहभागी होणार आहेत. अतिशय रंजक अशा लढती पाहण्याची संधी व त्याचा फायदा आपल्या मल्लांना निश्चितच होणार आहे. त्याचबरोबरीने उदयोन्मुख खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कुस्त्या पाहण्याची संधी मिळणार आहे,'' असे मुरलीधर मोहोळ यांनी नमूद केले.अशोक मोहोळ म्हणाले, ''मामासाहेब मोहोळ यांच्या गावात मोहोळ कुटुंबीय ही स्पर्धा भरवत आहेत, ही आनंदाची बाब आह. तसेच गेली ३८ वर्षे 'महाराष्ट्र केसरी'ची गदा देण्याचे भाग्य आम्हाला लाभत आहे. जो 'महाराष्ट्र केसरी' ठरतो, त्याच्या हातात मानाची गदा देताना समाधान वाटते.''विलास कथुरे म्हणाले, ''विविध दहा वजनी गटात, माती आणि गादी विभागात कुस्ती होतील. ९०० कुस्तीगीर, ९० व्यवस्थापक, ९० मार्गदर्शक, १२५ तांत्रिक अधिकारी, ९० पदाधिकारी सहभागी होणार आहेत.''

## शंखी गोगलगायीमुळे झालेल्या नुकसानीसाठी वाढीव दराने ९८ कोटी रुपयांची मदत

मुंबई प्रतिनिधी – राज्यात लातूर, उस्मानाबाद व बीड या तीन जिल्ह्यांमध्ये शंखी गोगलगायीमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. याबाबत मदत देण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले होते त्यानुसार शंखी गोगलगायीमुळे शेती पिकांच्या नुकसान झालेल्या बाधीत शेतक-यांना ९८ कोटी ५८ लाख रूपये निधी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी पेक्षा वाढीव दराने मदत वितरीत करण्यात येणार आहे.

या आपत्तीमुळे १ लाख १८ हजार ९९६ इतके शेतकरी बाधीत झाले आहेत. या बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी ९८ कोटी ५८ लाख रुपयांची मंजूर मदत तातडीने वितरीत करण्याचे आदेश नुकतेच मदत व पुनर्वसन विभागाकडून काढण्यात आले आहेत.

नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधितांच्या मदतीत वाढ करण्याचा निर्णय सरकारने काही दिवसांपूर्वी घेतला होता.त्यानुसार जिरायत शेतीसाठी पूर्वीचा दर प्रति हेक्टरी ६८०० वरून वाढवून प्रति हेक्टरी १३ हजार ६०० रुपये,बागायत शेतीसाठी प्रति हेक्टरी १३ हजार ५०० रूपयांवरुन २७ हजार रुपये आणि बहुवार्षिक शेतीसाठी पूर्वीचा दर १८ हजार रूपयांवरून ३६ हजार रुपये करण्यात आला आहे.जिरायत,बागायत व बहुवार्षिक पिकांच्या बाबतीत यापूर्वी दोन हेक्टरच्या मदतीत वाढ करून प्रति तीन हेक्टर अशी वाढ करण्यात आली आहे.

शेतक-यांसाठीचा मदतीचा निधी संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिका-यांकडे वर्ग करण्यात आला आहे. ही मदत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ऑनलाइन पद्धतीने जमा करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.याबाबतचा शासननिर्णय मदत व पुनर्वसन विभागाने १४ सप्टेंबर २०२२ रोजी निर्गमित केला आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यक्ती नव्हे तर विद्यापीठ!

### रशियात अण्णाभाऊंच्या पुतळा लोकार्पणाचा संस्मरणीय सोहळा

मॉस्को वृत्तसेवा – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या आयुष्यात इतके मोठे संस्थात्मक काम केले. त्यामुळे ते केवळ एक व्यक्ती नव्हे, तर विद्यापीठ होते, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज काढले. रशियातील मॉस्को येथे आज सकाळी मार्गारिटा रुडामिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचरच्या आवारात लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, आ. सुनील कांबळे, प्रा. संजय देशपांडे, माजी आ. सुधाकर भालेराव, अमित गोरखे हे सुद्धा या कार्यक्रमाला उपस्थित होते.



यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रासाठी, मराठी अस्मितेसाठी आजचा क्षण अतिशय गौरवाचा, अभिमानाचा आहे. वंचित, श्रमिकांचा आवाज आज रशियात बुलंद झाला. साहित्यभूषण, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळ्याचे आज मॉस्कोमध्ये लोकार्पण व्हावे आणि ती संधी मला मिळावी, हा माझ्या आयुष्यातील संस्मरणीय क्षण आहे. लोकशाहीर साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे यांनी वंचितांसाठी, समाजातील दुर्लक्षितांसाठी मोठे कार्य आपल्या आयुष्यात केले. वंचितांचा आवाज बनून त्यांनी काम केले. सामाजिक परिस्थितींमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. पण, तरीही इतके मोठे कार्य त्यांनी उभे केले. एकही दिवस शाळेत न गेलेल्या या व्यक्तिमत्त्वावर, त्यांच्या साहित्यावर आज लाखो विद्यार्थी पीएचडी करतात.

मॉस्को स्टेट लायब्ररीने हा उपक्रम हाती घेतला, मुंबई विद्यापीठाने सुद्धा यात सहयोग घेतला, याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून सामान्य माणसाला प्रेरणा मिळायची आणि आजही त्यांचे साहित्य हे सामान्यांना जगण्याची ताकद देते. 'फकिरा'तून अनेक कथा त्यांनी पुढे समाजापुढे आणल्या. अनेक संघर्षशील व्यक्तिमत्त्व त्यांनी जगापुढे आणले. रशियाचा दौरा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केला, त्यावेळी त्यांनी रशिया–भारत संबंध अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला. रशियातील क्रांतीतून त्यांना प्रेरणा मिळाली. पृथ्वी ही शेषनागावर नाही, तर श्रमिकांच्या डोक्यावर उभी आहे, हे सातत्याने ते सांगत. आज याठिकाणी त्यांच्या स्मृति उभ्या राहत आहेत, हा त्यांचा आणि त्यांच्या कार्याचा मोठा गौरव आहे. प्रत्येक मराठीजनाचा, महाराष्ट्रीयन माणसाचा सुद्धा हा गौरव आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले. **भारतीय नागरिकांशी संवाद** दरम्यान, काल रात्री झालेल्या एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी रशियातील भारतीय नागरिकांशी संवाद साधला. रशियन उद्योग जगत आणि भारतीय दुतावासातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. रशिया हा नेहमीच भारताचा चांगला मित्र राहिला आहे. व्यापार असो की संस्कृती सर्वच क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये आणि नागरिकांमध्ये अतिशय चांगले संबंध आहेत. आज पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात भारत उत्तम प्रगती करतो आहे. जगातील तिसर्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याची झेप घेतो आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. युवा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, भारत–रशिया संबंधांचाही अमृत महोत्सव, निर्यात धोरण, बंदरविकास, पर्यटन अशा विविध विषयांवर प्रश्नोत्तराचेही एक सत्र झाले. देवेंद्र फडणवीस यांनी मनमोकळी उत्तरे दिली.

## कोपरगाव नगरपरिषदेने अवास्तव करवाढ मागे न घेतल्यास

### आ. आशुतोष काळेंच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करणार – संदीप वर्पे

कोपरगांव प्रतिनिधी – कोपरगाव नगरपरिषदेने शहरातील नागरिकांच्या मालमत्तेवर केलेली अवास्तव करवाढ मागे घ्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष संदीप वर्पे यांनी केली असून अन्यथा आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करणार असल्याचा ईशारा दिला आहे. त्याबाबत कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नुकतेच कोपरगाव नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, मागील दोन वर्षापासून पासून संपूर्ण विश्वावर कोरोना महामारीचे संकट होते. त्यामुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊनने प्रत्येक घटक बाधित झाला होता. सर्वत्र आर्थिक मंदीचे सावट होते. मागील काही महिन्यांपासून कोलमडलेले जनजीवन व अर्थकारण कुठतरी पूर्वपदावर येत आहे. यापूर्वी ज्यावेळी कोपरगाव नगरपरिषदेने करवाढ करण्याचा निर्णय घेतला होता त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी त्या निर्णयाला तीव्र विरोध केला होता व आजही या कर वाढीला विरोधच आहे. कोपरगाव नगरपरिषदेने अचानकपणे करवाढ करून सर्व सामान्य नागरीकांसह छोट्या मोठ्या व्यावसायिकांवर आर्थिक बोजा टाकलेला आहे.त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजीचे वातावरण आहे. एकीकडे आर्थिक स्त्रोत मंदावले असतांना दुसरीकडे करण्यात आलेली




करवाढ कोपरगाव शहरवासियांसाठी मोठे आर्थिक संकट व अन्याय आहे. जर कोपरगाव नगरपरिषदेने केलेली करवाढ मागे घेतली नाही तर कोपरगाव शहरवासीयांच्या समवेत आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा ईशारा देखील दिला असून वेळप्रसंगी आ. आशुतोष काळे यांच्या नेतृत्वाखाली कायदेशीर लढाई देखील लढणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच या करवाढीबाबत ज्या नागरिकांची हरकत असेल त्या नागरिकांसाठी कोपरगाव नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारावर मदत केंद्र सुरु केले आहे. त्या ठिकाणी नागरिकांच्या हरकती नोंदवून घेण्यात येणार असून नागरिकांनी आपल्या हरकती नोंदवाव्यात असे आवाहन केले आहे. कोपरगाव नगरपरिषदेने नागरिकांचा अंत पाहता करण्यात आलेली करवाढ तातडीने मागे घ्यावी असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी शहराध्यक्ष सुनील गंगूले, गटनेते माजी नगरसेवक विरेन बोरावके यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. हे निवेदन कोपरगाव नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी ज्ञानेश्वर चाकणे यांनी स्वीकारले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष संदीप वर्पे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, शहराध्यक्ष सुनील गंगूले, माजी नगरसेवक विरेन बोरावके, मंदार पहाडे,कृष्णा आढाव, ऋषिकेश खैरनार, शुभम लासुरे, नितीन शिंदे, एकनाथ गंगुले, प्रशांत वाबळे, आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचलित बन्सी–रत्न चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्टतर्फे

### जैन समाजातील आदर्श माता–पिता, समाजशिरोमणी, समाजभूषण, समाजरत्न, मानवसेवा राष्ट्रीय पुरस्कार; गुणवंत विद्यार्थ्यांचाही होणार सन्मान

पुणे प्रतिनिधी – सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या बन्सी–रत्न चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. समाज घडवणाऱ्या जैन धर्मातील महनीय व्यक्तींना बन्सी–रत्न चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्टतर्फे दरवर्षी 'बन्सी–रत्न आदर्श माता–पिता राष्ट्रीय पुरस्कार', 'समाजशिरोमणी', 'समाजभूषण', 'समाजरत्न', 'मानवसेवा' पुरस्कार प्रदान करण्यात येतात. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि उपरणे असे या पुरस्काराचे स्वरूप असते.

या पुरस्कारांसोबतच जैन, गुजराती, माहेश्वरी, अगरवाल समाजातील दहावी, बारावी, पदवी व पदव्युत्तर शिक्षणातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येतो. या वर्षीपासून सर्व समाजातील दहावी–बारावी, पदवी व पदव्युत्तर शिक्षणातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना आपल्या करिअरच्या, तसेच जीवनाच्या योग्य वाटा दाखविण्यासाठी हा कार्यक्रम महत्वपूर्ण असतो, असे सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनचे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी स्पष्ट केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, ''पात्र विद्यार्थ्यांना गुणवत्तेचे प्रमाणपत्र, सुवर्ण पदक आणि मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज आणि गुणपत्रक सादर करावेत.ुींॲूवरींर. ेॲस या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला गुणवंत विद्यार्थी सन्मान अर्ज (मेरिटोरियस स्टुडन्ट फेलिसिटेशन फॉर्म) भरणे व विद्यार्थ्यांनी गौरव समारंभाला प्रत्यक्ष उपस्थित असणे आवश्यक आहे. अत्यंत नावाजलेल्या या कार्यक्रमाकरिता ऑल इंडिया अँटी टेररिस्ट फ्रंटचे अध्यक्ष एम. एस. बिट्टा, प्रख्यात योगगुरु डॉ. संप्रसाद विनोद, प्रख्यात अभिनेता श्री रझा मुराद, प्रख्यात आयटी तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर, विख्यात उद्योगपती आणि समाजसेवक श्री विठ्ठल मणियार, प्रसिद्ध लेखक आणि पासपोर्ट मॅन ऑफ इंडिया डॉ. ज्ञानेश्वर मुळे, भजनसम्राट पदमश्री अनुप जलोटा, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे अधिष्ठाता प्रा. डॉ. शरदचंद्र दराडे, प्रख्यात अभिनेत्री श्रीमती सोनाली कुलकर्णी, विपश्यना केंद्र पुणेचे अध्यक्ष डॉ. दता कोहिनकर, तसेच उद्योजक अविनाशजी चोरडिया इत्यादी मान्यवरांनी प्रमुख पाहुणे तसेच तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लावली आहे.

''जैन समाजातील पुरस्कारांसाठी इच्छुक व्यक्तींनी 'आदर्श माता–पिता राष्ट्रीय पुरस्कार', 'समाज शिरोमणी', 'समाजभूषण', 'समाजरत्न', 'मानवसेवा' पुरस्कारासाठी अर्ज पाठवावेत. आपली स्वतःची माहिती, परिचयपत्र, फोटो, आजवरच्या उल्लेखनीय गोष्टी, आधी मिळालेले पुरस्कार आदी माहिती, कोणत्या पुरस्कारासाठी अर्ज पाठवत आहात त्याचा उल्लेख करून ींाींआींॲूवरींर. शर्वी.ळप यावर पाठवावे. अधिक माहितीसाठी ८९५६९३२४००, ८३८००३८९७४ किंवा ८६०५८५७५५५ या क्रमांकांवर संपर्क करावा. सत्कार समिती आलेल्या अर्जांची छाननी करून योग्य व्यक्तींची निवड करेल. सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख २२ सप्टेंबर २०२२ अशी असून हा सत्कार समारंभ सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, बावधन पुणे येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ुींॲूवरींर.ॲस या संकेतस्थळाला भेट द्यावी, अशी माहिती बन्सी–रत्न चॅरिटेबल वेलफेअर ट्रस्टच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया व सचिव सिद्धांत चोरडिया यांनी दिली.

यंदा पुरस्काराचे पाचवे वर्ष आहे. यापूर्वी पुढील प्रतिष्ठित व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आदर्श माता–पिता राष्ट्रीय पुरस्कार (श्रीमती सुदर्शनाजी आणि श्री दीपचंदजी पारख, श्रीमती प्रतिभाजी आणि श्री शामजी जाजू, श्रीमती शांताबाईजी आणि श्री बिर्दीचंदजी नवलखा, श्रीमती प्रमिलाबाईजी आणि श्री नौपतलालजी साकला, श्रीमती चंचलाजी आणि श्री मोतीलालजी सुराणा), समाजरत्न राष्ट्रीय पुरस्कार (माताजी कमल देवी कर्नावट, श्रीमती नीताजी संजय घोडावत, श्रीमती सुशिलाजी ईश्वरदासजी बंब), समाजशिरोमणी राष्ट्रीय पुरस्कार (श्री रामलालजी सिंघवी, श्री विजयकांतजी कोठारी, प्रा डॉ अशोककुमारजी पगारिया), मानवसेवा राष्ट्रीय पुरस्कार (श्री विलासजी राठोड, श्रीमती भारती विजय भंडारी, डॉ रसिकजी शेठीया), समाजभूषण राष्ट्रीय पुरस्कार (श्री ओमप्रकाशजी रांका, श्री पृथ्वीराजजी धोका, श्री महावीरजी नहार) यांचा समावेश आहे, असे त्यांनी नमूद केले.

### गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अवाश्यक पात्रता :

* शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये १० वी किंवा १२ वी परीक्षा (कोणतेही शासनमान्य बोर्ड) ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण
* शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये पदवी परीक्षा (कला, वाणिज्य व विज्ञान शाखा) ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण
* शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये फार्मसी, इंजिनीरिंग, आर्किटेक्चर व तत्सम ४ वर्षाचे पदवी अभ्यासक्रम ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण
* शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये पी एचडी उत्तीर्ण
* शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये राष्ट्रीय महत्वाच्या शैक्षणिक संस्थेमध्ये (उदा. आयआयटी, आयआयएम, शासनमान्य महाविद्यालयात एमबीबीएस, एमडी इत्यादी) निवड व प्रवेश
* शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये सीए, सीएस, आयसीडब्ल्यूए इत्यादी परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण
* शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये प्रतिष्ठित परदेशी विद्यापीठात प्रवेश

### या पुरस्कारांसाठी आवश्यक वयोमर्यादा :

* आदर्श माता–पिता राष्ट्रीय पुरस्कार – वय वर्षे ८० किंवा अधिक
* समाज शिरोमणी पुरस्कार – वय वर्षे ६० ते ७० किंवा राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य
* समाजभूषण पुरस्कार – वय वर्षे ६० ते ७० किंवा राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य
* समाजरत्न पुरस्कार – वय वर्षे ५० किंवा अधिक (महिला)
* मानवसेवा पुरस्कार – वय वर्षे ३५ किंवा अधिक

# वैजापूर तालुक्यातील टूनकी येथे शैक्षणिक पालक मेळावा उत्सहात संपन्न

## मा.विद्यार्थी अण्णासाहेब ठेंगडे यांनी ५१ हजार , रुपये शाळेला देऊन ऋण फेडले

**वैजापूर / प्रतिनिधी**

----------

तालुक्यातील टूनकी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावी व त्यांचा गुणात्मक विकास व्हावा ,तसेच समाजाच्या सहभागातून शाळेच्या भौतिक गरजा पूर्ण व्हाव्यात यासाठी शालेय शिक्षण समिती सदस्य व सर्व शिक्षक वृंद यांनी बुधवार रोजी भव्य पालक मेळावा आयोजित केला होता.या मेळाव्याचे उदघाटन माजी शिक्षणाधिकारी धोंडिरामसिंह राजपूत,सामाजिक कार्यकर्ते तथा कॉग्रेस तालुकाध्यक्ष साहेबराव पडवळ,माउली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णासाहेब ठेंगडे,दैनिक प्रतिवीर औरंगाबाद अवृत्तीचे कार्यकारी संपादक विलास म्हस्के, सरपंच काकासाहेब झाल्टे यांनी द्वीप प्रज्वलित करून व राष्ट्रमाता जिजाऊ,छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमाना अभिवादन करून केले, शाळेच्या भौतिक सुविधा वाढाव्यात, या शाळेचा विद्यार्थी हा लोकसेवा



आयोग परीक्षा व स्पर्धा परीक्षेसाठी तयार व्हावा म्हणून अण्णासाहेब ठेंगडे यांनी एकावन्न हजार रुपये या शाळेसाठी देणगी दिली काही गावकरी ही पुढे आले व त्यानीही भरघोस आर्थिक सहाय्य केले, कार्यक्रमाला प.स.प्र.गटविकास अधिकारी एच.आर. बोयनार, सहायक गट विकास अधिकारी अमेय पवार,शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर,बी.के.म्हस्के व प्रा. प्रमोद पठारे,डी आर निकम,डॉ बी. एस. पाटील, समीर ठेंगडे,पत्रकार संचित कांबळे यांची उपस्थिती होती, पालकांनी आपल्या पाल्याकडे विशेष लक्ष द्यावे,त्यांच्यावर ईच्छा आकांक्षाचे ओझे लादु नये,त्यांना त्यांच्या आवडीने शिकू द्यावे त्यांना सर्व सुविधा पुरवाव्या व त्यांचा सर्वांगीण विकास करावा त्यांना नियमित शाळेत पाठवावे,त्यांना परिपूर्ण शिकवावे असे आवाहन वक्त्यांनी केले,कार्यक्रम अध्यक्षस्थानी धोंडिरामसिंह राजपूत होते,विलास झाल्टे ,प्रा.नामदेव निकम,प्रा.आनंद निकम, अण्णा ठेंगडे,के.डी. पाटील, अजय साळुंके यांनी मनोगत व्यक्त के.डी. पाटील,अजय साळुंके यांनी मनोगत व्यक्त केले,सूत्र संचलन श्री घोडेल सर यांनी केले तर आभार आनंद निकम यांनी मानले,शालेय शिक्षण समिती चे अध्यक्ष संदीप निकम, उपाध्यक्ष काकासाहेब झाल्टे, मुख्याध्यापिका श्रीमती डी. के. औंधकर व शालेय समिती सदस्य व शिक्षक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# एम.एस.जी.एस इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये हिंदी दिवस साजरा

अंदरसुल प्रतिनिधी - अंदरसुल येथील मातोश्री शांताबाई गोविंदराव सोनवणे इंग्लिश मिडीयम मध्ये आज १४ सप्टेंबर हिंदी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विषय शिक्षक अजहर खतीब तर प्रमुख पाहुणे म्हणुन रामनाथकाका एंडाईत,हिंदी शिक्षक अमजद अंसारी,आरती राजपूत,अपर्णा लक्कडकोट हे होते.. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता प्रतिमा पूजन व सहकार व शिक्षण महर्षी स्व.गोविंदनाना सोनवणे यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाची प्रस्तावना जानवी अमोल सोनवणे हिने केली.यानंतर विद्यार्थी दिव्या सोनवणे,प्रतीक्षा ढमाले,प्रणव मगर,अनुष्का देशमुख,धनश्री सोमासे, प्रगती जेजुरकर,जानवी सैंदाने,अक्षदा खैरनार,मानसी शिनगारे,स्नेहल देशमुख,तेजस्वी वडाळकर, समर्थ आरखडे, गौरव आहेर,घनश्याम वाकचौरे,खदीजा अल्ताफ खान,कहेकशा शेख,ईश्वरी आहेर,आदर्श देशमुख,आरती खैरनार,प्रगती



ढोले,जानवी देशमुख,आरुषी खैरनार, वर्षा शर्मा,मो.अली अल्ताफ खान, प्रणिता कचरे,विनंती देवरे,आराध्या जगताप,शिवांजली जगताप,सारा फातिमा शेख,स्नेहल वडाळकर,राशी सोनवणे,प्रेम चव्हाण यांनी आपले भाषण सादर केले.यानंतर हिंदी शिक्षक अमजद अंसारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणांत हिंदी शिक्षक अजहर खतीब यांनी हिंदी भाषेचे महत्त्व यावर विचार व्यक्त केले. याप्रसंगी प्रिंसिपल अल्ताफ खान,दीपक खैरनार,अमोल आहेर,गणेश सोनवणे,गौरव सैंदाने,मनीष सैंदाने,अजीम पटेल,ऋषिकेष दुसाने,माधुरी माळी, सुनीता वडे,चेतना माकूने,शर्मिला पवार,आलिया खान,प्रिया भागवत,सुस्मिता देशमुख आदी सह सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकांक्षा रोठे व अमृता भागवत यांनी तर आभार प्रदर्शन स्मिता देशमुख यांनी केले.

# कोसळलेलं आभाळ सावरण्यासाठी पुढे आले शेकडो मदतीचे हात !

## मित्राच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांना दिला आधार

येवला / अंदरसुल प्रतिनिधी - मित्र म्हणजे दुसऱ्या आईच्या पोटी जन्मलेला आपलाच अवयव असतो, असे एक कवी म्हणतो..., मित्रप्रेमाचे अनोखे उदाहरण नाशिक जिल्ह्यात पहावयास मिळाले. ठेकेदार म्हटले की, कामासाठी भांडणारे, अगदी एकमेकांवर धावून जाणारे ठेकेदार दिसतात. मात्र, याच ठेकेदारांच्या एकजुटीचे, माणुसकीचे दर्शन जिल्हा परिषदेत बघावयास मिळाले आहे. येवला येथील देवेंद्र (बंडू) शिंदे या ठेकेदाराचा आजारपणाने मृत्यू झाला. त्याच्या पश्चात कुटुंब उघड्यावर पडू नये, यासाठी मित्राच्या मदतीकरिता सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषदेतील ठेकेदार पुढे सरसावले. एकजूट झालेल्या ठेकेदारांनी निधी गोळा करत, शिंदे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत केली आहे. शिंदे यांच्या दशक्रिया विधीच्या दिवशी मंगळवारी (दि. १३) ठेकेदारांनी जमा केलेला ६ लाख ५७ हजार ७०० रुपयांचा धनादेश शिंदे कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आला.

कोरोना संकटापासून ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार (सुबे), मजूर संस्था चालक अडचणीत सापडले. शासकीय पातळीवर कामे नसल्याने, ठेकेदार जर्जर झाले; परंतु या परिस्थितीत सावरत गतवर्षी कामे घेत पुन्हा नव्याने सुरुवात केली. कोरोनाचे संकट कमी झाल्याने गतवर्षी जिल्हा नियोजन समिती, बांधकाम, १५ व्या वित्त आयोग यातून कामे मिळवली. हा गाडा सुरळीत होत असतानाच राज्यात सत्तांतर झाले. महाविकास आघाडी सरकार कोसळले अन् शिंदे-फडणवीस यांचे सरकार आले. सत्तांतर झाल्यानंतर नवीन सरकारने गत सरकारच्या सर्व कामांना स्थगिती देण्याचे धोरण स्वीकारले. सुरू झालेल्या, सुरू न झालेल्या, तसेच मंजूर सर्वच कामे थांबल्याने, ठेकेदारांची ३०० ते ४०० कोटींची बिले शासनाकडे थकली आहेत. त्यामुळे ठेकेदार पुन्हा आर्थिक अडचणीत सापडला. या आर्थिक संघर्षातच येवला तालुक्यातील जळगाव नेऊर येथील ठेकेदार देवेंद्र शिंदे यांना जानेवारी २०२१ मध्ये फुप्फुसाचा कॅन्सर झाल्याचे निदान झाले. घरातील आर्थिक परिस्थिती



जेमतेम असताना कुटुंबाने दवाखाना केला. यात लाखो रुपये खर्ची झाले. मात्र, शिंदे यांचे प्राण वाचू शकले नाही. ४ सप्टेंबर २०२२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने कुटुंबावर मोठा आघात झाला. आपला एक सहकारी ठेकेदार गेल्याचे शल्य ठेकेदारांना होती. यासाठी ठेकेदारांनी एकत्र येत त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात देण्याचा निर्णय घेतला. सोशल मीडियाच्या माध्यमातून ठेकेदारांनी एकमेकास आवाहन केले, अवघ्या दहा दिवसांत सहा लाख ५७ हजार रुपयांचा निधी जमा झाला. तब्बल १६० ठेकेदारांनी आपापल्या परीने मदतीचा हात मित्राला दिला. जमा झालेल्या निधीचा धनादेश मंगळवारी त्यांच्या कुटुंबीयांकडे देण्यात आला. याकामी प्रामुख्याने मकरंद सोनवणे, प्रकाश बनकर पाटील, ठेकेदार संघटनेतील हरपालसिंह भल्ला, सुनील कांदे, अनिल आव्हाड, भाऊसाहेब सांगळे, चंद्रशेखर डांगे, सागर विंचू यांनी पुढाकार घेतला.

# राजेश्वरी कोठावळे हाफकिडो बॉक्सिंगच्या चेअरमन'पदी

## राज्य स्तरावर काम करण्याची मिळाली संधी

**पारनेर/प्रतिनिधी :**

------------

हाफ किडो बॉक्सिंग महाराष्ट्र ऑर्गनायझेशन या संघटनेच्या चेअरमन पदी अहमदनगर राष्ट्रवादी युवती काँग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्ष राजेश्वरी कोठावळे यांची निवड झाली.

या पदाची निवड प्रक्रिया ही लोणावळा येथे पार पडली यावेळी राजेश्वरी कोठावळे या विजयी झाल्या.

हापकिडो बॉक्सिंग महाराष्ट्र ऑर्गनायझेशन या संघटनेच्या माध्यमातून राजेश्वरी कोठावळे अनेक दिवसांपासून कार्यरत आहेत अनेक खेळाडूंना त्यांनी आजपर्यंत प्रशिक्षण दिले आहेत त्या एक आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच एक उत्तम खेळाडू सुद्धा आहेत हाफ किडो बॉक्सिंग महाराष्ट्र राज्य ऑर्गनायझेशनच्या चेअरमन'पदी त्यांना संधी मिळाल्यामुळे खऱ्या अर्थाने पारनेर तालुक्याला आता राज्यस्तरावर बहुमान मिळाला आहे.

राजेश्वरी कोठावळे या एक उत्तम समुपदेशक आहेत बॉक्सिंगच्या



माध्यमातून त्यांनी अनेक खेळाडूंना प्रशिक्षण दिले आहे. त्यांनी आजपर्यंत पारनेर तालुक्यात व अहमदनगर जिल्ह्यामध्ये १० ते १२ हजार खेळाडूंना यशस्वी बॉक्सिंग प्रशिक्षण दिले आहे.

कोठावळे यांची महाराष्ट्र राज्य हाफ कीडो बॉक्सिंग या संघटनेच्या चेअरमन'पदी त्यांची निवड झाल्यामुळे त्यांना राज्यस्तरावर संघटनात्मक पातळीवर काम करण्यास मिळणार आहे आणि हा पारनेर तालुक्याच्या दृष्टीने अभिमानाचा क्षण आहे.

निवडीनंतर राजेश्वरी कोठावळे म्हणाल्या की हाफ किडो बॉक्सिंग या संघटनेच्या चेअरमन पदी निवड झाल्यामुळे या पुढील काळामध्ये बॉक्सिंग कराटे या खेळांच्या माध्यमातून ग्रामीण स्तरावर अनेक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणार आहे शासन स्तरावर प्रयत्न करून ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य ती संधी मिळण्यासाठी यापुढील काळात संघटनेच्या माध्यमातून प्रयत्नशील राहणार आहे.

राजेश्वरी कोठावळे यांच्या निवडीनंतर त्यांना पारनेर नगरचे आमदार लोकनेते निलेश लंके, राष्ट्रवादी युवती काँग्रेस पार्टीच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणाताई सलगर यांनी अभिनंदन केले आहे व पुढील कार्य शुभेच्छा दिल्या.

**********

# लोकसहभागातून तयार केलेल्या कोळाईदेवी विद्यालयाच्या

## नूतन इमारतीचे खा. शरदचंद्र पवार यांच्या हस्ते लोकार्पण...

श्रीगोंदा प्रतिनिधी : - श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सुमारे एक कोटी ४० लाख रुपये खर्च करत लोकसहभागातून तयार केलेल्या नूतन इमारतीचा उद्घाटन समारंभ तसेच लोकार्पण समारंभ शुक्रवार दि.१६ रोजी दुपारी १२ वाजता खा. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती प्राचार्य हौसराव दांगडे यांनी दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील हे असून प्रमुख अतिथी म्हणून माजी गृहमंत्री आ. दिलीपराव वळसे पाटील आणि रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग अध्यक्ष आ. आशुतोष काळे हे आहेत.

यत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागाचे माजी अध्यक्ष माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांच्या प्रयत्नातून कोळगाव येथील श्री कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला ६ वर्ग खोल्यासाठी ४० लाख रुपये मंजूर करण्यात येऊन बांधकामाची सुरुवात होताच माजी प्राचार्य एम एस लगड यांच्या प्रयत्नाने लोकवर्गणी गोळा करून विद्यालयाच्या प्रांगणात १२ वर्ग खोल्यासाठी सुमारे एक कोटी रुपये जमा करत एकूण १८ वर्ग खोल्यासाठी १ कोटी ४० लाख रुपये खर्च करून भव्य अशी इमारत तयार करण्यात आली. या इमारतीचे उद्घाटन तसेच लोकार्पण सोहळा खा.शरदचंद्र पवार यांच्या हस्ते शुक्रवार दि. १६ रोजी दुपारी २ वाजता होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत प्राचार्य हौसराव दांगडे यांनी देत या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन स्कूल कमिटी सदस्य ताराकाकी लगड, शंकरराव लगड, हेमंत नलगे सर तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमित लगड यांनी केले.

***********

# अखेर मनसे चे ठरले...

## पालिका, महापालिका निवडणुका स्वबळावर लढवणार

मुंबई प्रतिनिधी - राज्यात सध्या महापालिका निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. महापालिका निवडणुकांसाठी राज ठाकरेंची मनसे ही भाजप आणि शिंदे गटाशी हातमिळवणी करणार का? या प्रश्नाची जोरदार चर्चा रंगली असतानाच मनसेने 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. राज ठाकरे यांच्या आदेशानंतर मुंबई महापालिकांमध्ये सर्व जागांवर लढण्याची तयारी सुरु केल्याची माहिती मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दिली.

गेल्या काही दिवसांत भाजप नेते आणि राज ठाकरेंच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. तसेच गणपती दर्शनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री




एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे हे दोनदा एकमेकांना भेटले. त्यामुळे मनसेच्या इंजिनाला दोन नवीन डबे मिळणार असल्याची चर्चा सुरु होती. मात्र आता मनसेने स्वबळाचा नारा देत भूमिका स्पष्ट केली.

राज ठाकरेंच्या आदेशानुसार, मुंबईत २२७ जागांवर उमेदवार उभे करणार असल्याची माहिती मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दिली.

युती हा जर तरचा विषय आहे. आमची स्वबळावर लढण्याची तयारी आहे. कुठल्याही पक्षाचा बालेकिल्ला नसतो. कार्यकर्त्यांमधे चैतन्य कायम ठेवण्यासाठी पालिका निवडणुक स्वबळावर लढणार असल्याचे संदीप देशपांडे यांनी स्पष्ट केले. यासोबतच, राज ठाकरेंच्या आदेशानुसार तयारीला सुरुवातदेखील केली असल्याचे देशपांडे यांनी म्हटले आहे.

तसेच, मनसेचा विदर्भ दौरा सुरू होत आहे. पक्ष वाढीसाठी हा दौरा करण्यात येणार असल्याचे संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे. यासोबतच, दसरा मेळाव्यावरुन सुरु असलेल्या वादावरही त्यांनी भाष्य केले. दसरा मेळावा कधी आणि कुठे होतोय हे महत्त्वाचे नाही. बाळासाहेबांचे विचार कोणाकडे आहेत हे महत्त्वाचे आहे. बाळासाहेबांचे विचार फक्त राज ठाकरे मांडतात. त्यामुळे कोणाचा मेळावा कुठे होतो ह्याला फार महत्त्व नाही, असे संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे.

काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली होती. एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांच्या घरी जाऊन बाप्पाचे दर्शन घेतले होते. तेव्हापासून महापालिकेच्या निवडणुकीसाठी मनसे आणि शिंदे गटाची युती होणार असल्याची चर्चा सुरू होती.

## प्रकल्प ..

प्रकल्प एक मिळतो
रे करूनि मिन्नतवारी
ते खुशीत राज्यकर्ते
आम्हीचं जगातभारी

सोयी सुविधापाऊस
कृपा करी अपरंपारी
उद्योजक ना कुणाचे
असेअस्सल व्यापारी

शुक्राचार्य जागोजाग
अडवून बसला झारी
हव्यास मुळी सुटेना
करत राहतो बेजारी

सावजा वरती नजरा
टपूनि बसल्या घारी
पळवू हळूचं प्रकल्पा
न्यावा आपल्या दारी

भांडत बसलेत इकडे
विरोधक न् सत्ताधारी
लक्ष नाही कुणाचे ते
त्यांनापडले पथ्यावरी

निघूनचालला प्रकल्प
तिसरे पडलेत भारी
हातात राही धुपाटणे
म्हणा आहो आभारी

–हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६
www.kavyakusum.com
===========

## साईनाथ ..

भलीमोठी रांग ती
साईनाथ मंदिरात
गर्दी रे भाविकांची
दर्शनाला दिन रात

गर्दी आधी हो खूप
हार फुले दुकानात
व्यवसाय जोमदार
खपे होई हातोहात

हार फुले बंद केले
निर्णया अकस्मात
बंद पडे अचानक
धंदे सर्वं पिढीजात

दुकानदार खिन्न ते
नाही त्या धर्मजात
असो विभीन्न चेहरे
सारखेचं असे हात

भक्तीभावा भुकेला
कनवाळू साई नाथ
नको तया हार फुले
फक्त जोड दोनहात

दुकानदारी चालता
किती पोटे भरतात
चालू करे दुकाने ती
साई नाथ जाणतात

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..
www.kavyakusum.com

# १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' चे आयोजन

### निवासी उपजिल्हाधिकारी पल्लवी निर्मळ यांचे निर्देश

अहमदनगर प्रतिनिधी - सामान्य नागरिकांच्या तक्रारी, प्रलंबित अर्जांवर कालमर्यादेत निपटारा व्हावा यासाठी जिल्हयात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर,२०२२ या कालावधीत 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' आयोजित करण्यात आला असून जिल्हयातील शासकीय व निमशासकीय कार्यालय प्रमुखांनी त्यांच्यास्तरावर प्रलंबित सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन मोहिम स्वरुपात निपटारा करण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी पल्लवी निर्मळ यांनी दिले.



सामान्य नागरिकांचे प्रलंबित अर्ज, तक्रारी यांचा निपटारा व्हावा यासाठी हा 'सेवा पंधरवडा' राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या सेवा पंधरवड्यात आपले सरकार, महसूल विभाग, कृषी विभाग, महावितरण, महाऊर्जा, सामाजिक न्याय विभाग, सामाजिक सुरक्षा विभाग, आदिवासी विकास विभाग, उच्च व तंत्र विभाग, डी.बी.टी., नागरी सेवा केंद्र, तसेच ज्या विभागांचे स्वत:चे पोर्टल आहे अशा वेबपोर्टलवर १० सप्टेंबर, २०२२ पर्यंत प्राप्त झालेल्या तक्रारींचा आढावा घेऊन निपटारा या पंधरवडयात करण्यात येणार आहे. मदत आणि पुनर्वसन, कृषी, महसूल, अन्न व नागरी पुरवठा, ग्राम विकास, नगर विकास, आरोग्य, पाणी पुरवठा, महावितरण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय या विभागातील सेवांचाही त्यात समावेश करण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा प्रमुखांच्या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी पल्लवी निर्मळ यांनी सांगितले. निपटारा करण्यात आलेल्या प्रकरणांचा गोषवारा संबधित अधिकाऱ्यांनी दैनंदिन स्वरुपात सादर करण्याच्या सूचनाही बैठकीत दिल्या. पंधरवाडयाच्या कालावधीनंतर प्रलंबित प्रकरणांसंदर्भात वस्तुनिष्ठ स्वरुपात अहवाल सादर करावयाचा असून जिल्हाधिकारी या कार्यवाहीवर वैयक्तिक लक्ष ठेवणार असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यामध्ये हयगय करु नये असे निर्देश त्यांनी दिले.

विविध विभागांच्या १४ सेवांचा समावेश

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नवीन शासन निर्णयानुसार मदत निधीचे वितरण करणे, तांत्रिक अडचणींमुळे पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या प्रलंबित असलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ देणे, फेरफार नोंदीचा निपटारा करणे, शिधापत्रिकांचे वितरण,विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे, नव्याने नळ जोडणी, मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र देणे, प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी देणे, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजने अतंर्गत सिंचन विहिरी करिता अनूसुचित जमातीच्या लाभार्थ्यो ची ऑनलाईन नोंदणी करणे, अनूसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रलंबित वन हक्क पट्टे मंजूर करणे (अपिल वगळून), दिव्यांग प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देणे अशा सेवांचा समावेश करण्यात आला असल्याचे पल्लवी निर्मळ यांनी यावेळी सांगितले.

# ग्रामदैवताचा जीर्णोद्धार माझ्या हातून हे माझे भाग्य : सुजित झावरे पाटील

### ढवळपुरीत मारुती मंदिराच्या सभामंडपाचे भूमिपूजन संपन्न

**पारनेर/प्रतिनिधी :** तालुक्यातील ढवळपुरी येथे सुजित झावरे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून व खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या विकास निधी अंतर्गत लालूनाईक तांडा, पठारवाडी, कुटे आखाडा, धनगरवाडे येथील मारुती मंदिर सभा मंडप बांधणे भूमिपूजन कार्यक्रम सोमवार दि. १२ रोजी सायंकाळी जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले की ढवळपुरी गावाने झावरे कुटुंबावर आज पर्यंत खूप प्रेम केले व करत आहेत. स्वर्गीय आमदार वसंतराव झावरे पाटील यांना विधानसभेवर पाठवण्यासाठी ढवळपुरी गावचे मोठे योगदान आहे हे मी कधीही विसरणार नाही. ढवळपुरी परिसरामध्ये काम करत असताना आजपर्यंत अनेक विकासाची कामे मार्गी लावले आहे ढवळपुरी भागामध्ये विकासाचा डोंगर उभा राहण्यासाठी मी यापुढील काळातही प्रयत्नशील आहे. विकास कामांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचा विकास होत असतो. यापुढील काळात ढवळपुरी परिसरातील या ग्रामीण भागातील समाजापर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविण्यासाठी मी



प्रयत्नशील असेल. खासदार सुजय विखे यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त विकासाचा निधी या भागाला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी झावरे म्हणाले तसेच ते पुढे म्हणाले की मी आज येथील मारुती मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन केले खऱ्या अर्थाने ग्रामदैवताचा जीर्णोद्धार माझ्या हातून होत आहे हे मला भाग्यच मिळाले. देव देवता हे खऱ्या अर्थाने आपल्या सर्वांचे शक्तिस्थान असल्याचे ते यावेळी म्हणाले. दरम्यान यावेळी कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र क्रिकेट संघामध्ये ढवळपुरी येथील उदयन्मुख खेळाडू शुभम कुटे याची निवड झाली याबद्दल त्याला सुजित झावरे पाटील यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम प्रसंगी उपस्थित खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष ॲड. बाबासाहेब खिलारी म्हणाले

ढवळपुरी परिसरामध्ये झावरे यांनी आजपर्यंत अनेक विकासाची कामे मार्गी लावली आहेत. यापुढेही सुजय विखे व सुजित झावरे विकासाचा रथ पुढे घेऊन जाण्यास समर्थ आहेत त्यांच्या माध्यमातून या भागात विकासाचा डोंगर नक्कीच उभा राहील.

यावेळी सुजित झावरे पाटील यांच्या समावेत खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष ॲड. बाबासाहेब खिलारी, अरुणराव ठाणगे, मा. सरपंच ढवळपुरी बबनराव पवार सर, बाबाजी चौधरी, व्होनाभाऊ घोगरे, शिवाजी खोडदे, खंडू कोळेकर, युवा नेते स्वप्नील राहींज, नवनाथ राठोड, विजय जाधव, साहेबराव राठोड, राम जाधव, राजू राठोड, संजय राठोड, लक्ष्मण पवार, नवनाथ जाधव, नंदकुमार कुटे सर, गोटिराम पवार, संदीप पवार, कनिराम जाधव, रोहित जाधव, व्होनाजी जाधव, परसराम चव्हाण, देविचंद राठोड, ताणू राठोड, दगडु पवार, पी. जी. पवार सर, लालूनाईक तांडा, पठारवाडी, कुटे आखाडा, धनगरवाडे वरील धनगर, लमाण समाजाचे महिला व बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# साई संजीवनी बँकेस राज्यस्तरावरील सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार

कोपरगांव :- माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व भाजपाच्या प्रदेश सचिव सौ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या येथील साई संजीवनी बँकेस सलग आठव्यांदा युनिट बँका व शंभर कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँक गटात राज्यस्तरावरील द्वितीय क्रमांकाचा सर्वोकृष्ट बँक पुरस्कार नुकताच जाहीर झाल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष व युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांनी दिली.

महाराष्ट्र अर्बन को. ऑपरेटीव्ह बँक्स फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी व सचिव सौ. सायली भोईर यांनी पुरस्कार निवडीचे लेखी पत्रान्वये कळविले आहे. अडचणींतुन मार्ग काढत साई संजीवनी बँकेने १०० कोटी रूपये ठेवी असणा-या गटात स्थान पटकावले आहे. महाराष्ट्र अर्बन को. ऑपरेटीव्ह बँक्स फेडरेशन दरवर्षी राज्यभरातील सहकारी बँकींग क्षेत्रात उत्तम कामगिरी करणा-या सभासद नागरी सहकारी बँकांच्या कार्याची दखल घेवुन



त्यांना पुरस्कार प्रदान करत असते. बँकेचे संचालक, सर्व ठेवीदार सभासद शेतकरी हितचिंतक यांनी बँक कारभारावर दाखविलेल्या अढळ विश्वासामुळेच बँकेस हा पुरस्कार मिळाल्याचे विवेक भैया कोल्हे यांनी सांगितले. ग्रामीण अर्थकारणाला बळ देवुन सहकारातून समृद्धी घडविण्यात कार्यरत असलेल्या बँकांना अधिकाधिक प्रोत्साहन यातुन मिळत असते. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी दूर दृष्टीकोनातुन सहकारी साखर कारखानदारी बरोबर आर्थीक पत पुरवठ्यासाठी साई संजीवनी को. ऑपरेटीव्ह बँकेची स्थापना केली. त्यातुन शेतक-यांना आर्थीक पाठबळ देत शेती फुलविली आहे. सदरचा पुरस्कार २३ सप्टेंबर रोजी दुपारी अडीच वाजता महाराष्ट्र अर्बन को. ऑपरेटिव्ह बँक फेडेशनचे अध्यक्ष श्री. विद्याधर अनास्कर, उपाध्यक्ष श्री. रमाकांत खेतान, अर्थतज्ञ व सहकार क्षेत्रात अन्य मान्यवरांच्या हस्ते भारतीय क्रिडा मंदिर वडाळा मुंबई येथे प्रदान करण्यांत येणार आहे. साई संजीवनी बँकेचे उपाध्यक्ष रेवजी आव्हाड, संचालक सर्वश्री. नितीनदादा कोल्हे, नारायण अग्रवाल, शरद गवळी, गोरख आहेर, अनिल कोल्हे, संभाजीराव रक्ताटे, अशोकराव टुपके, जयंतीलाल पटेल, सौ. संगिता बापूसाहेब बारहाते, गंगूबाई विश्वनाथ जावळे, मुख्य सरव्यवस्थापक पदमाकर सभारंजक, यांच्यासह सर्व सभासद, विविध क्षेत्रातील पदाधिकारी यासह अनेकांनी युवानेते अध्यक्ष विवेकभैय्या कोल्हे यांचे अभिनंदन करून भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

# कावेरी पाडेकर हिची राज्यस्तरीय बास्केटबॉल संघात निवड

कोपरगांव प्रतिनिधी - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवस्ती नवीन ता. कोपरगाव या शाळेतून इ. ७ वी पर्यंत शिक्षण घेवून पुढील शिक्षणासाठी ८ वी ला हायस्कूलला दाखल झालेली कु. कावेरी गोरख पाडेकर हिची राज्यस्तरीय बास्केटबॉल संघात निवड झालेली आहे. या संघात ती अहमदनगर जिल्हयाचे नेतृत्व करणार आहे.



कावेरीला पहिल्यापासून खेळाची आवड आहे.तिने आपल्या उच्च प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक प्रवासात तालुका क्रिडा स्पर्धेत लांब उडी मध्ये लहान गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच विभागीय आयुक्तालय मार्फत 'चला खेळू या' (ड्शीं'ी श्रिू) या स्पर्धेत याच क्रिडा प्रकारात कांस्य पदक मिळवले आहे. कावेरी उत्कृष्ट धावपटू देखील आहे. तिने धावणे मध्येही मोठ्या गटात (इ.६ ते ८) तालुकास्तरीय स्पर्धेत क्रमांक मिळवला आहे. तसेच तालुका पातळीवर निवड झालेल्या आपल्या शिंदेवस्ती नवीन शाळेच्या कबड्डी संघाचे नेतृत्व तिने केले आहे. अशा या खिलाडूवृत्तीच्या कावेरीचे आणि तिच्या शिक्षकांचे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

# सोसायटी निवडणूक ; अनामत रकमेचा घोळ मिटता मिटेना अधिकाऱ्यांच्या आले जीवाशी

## जिल्हा उपनिबंधक मोठे की सहाय्यक निबंधक

श्रीगोंदा प्रतिनिधी ;- श्रीगोंदा तालुक्यातील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या असून निवडणूकामी भरलेल्या अनामत रकमेचा घोळ अजूनही मिटेना तर हा घोळ अनेकांच्या अंगलट आल्याचे चित्र दिसून येत आहे

श्रीगोंदा तालुक्यात तब्बल १५१ विविध कार्यकारी सहकारी सोसायट्या आहेत या सर्व सोसायट्यांची जवळपास निवडणुका पार पडल्या आहेत या निवडणुकासाठी उमेदवारी करणाऱ्या सर्व उमेदवारांनी अनामत रक्कम म्हणून ५०० रु निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे जमा केली होती मात्र काही सोसायट्या बिनविरोध झाल्या तर निवडणुका झालेल्या सोसायटी मध्ये अनेक जन विजयी झाले अनेक जणांनी उमेदवारी अर्ज माघारी घेतले त्यांची अनामत रक्कम आजपर्यंत त्या उमेदवारांना मिळालेली नाही तर ठराविक सोसायटी मध्ये अनामत रक्कम उमेदवारांना परत मिळाली पण आहे सदर प्रकाराबाबत सजग नागरिकाने जिल्हा उपनिबंधक यांच्याशी पत्रव्यवहार केल्यावर त्यांनी सहाय्यक निबंधक यांना पत्रव्यवहार केल्यावर बोटावर मोजण्या इतक्या संस्थाना अनामत रक्कम परत मिळाली आहे मात्र तक्रारदार यांना माहिती देण्यास अजूनही मोठ्या प्रमाणात विलंब लागत आहेत त्यामुळे प्रशासन यामध्ये वेळकाढू भूमिका घेत आहे कि काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे तर काही निवडणूक निर्णय अधिकारी यांना हि सर्व माहिती गोळा करताना जीवाशी आल्याचे चित्र दिसत आहे तर सहाय्यक निबंधक अभिमान थोरात यामध्ये वेळ काढू भूमिका घेवून माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याचे तक्रारदार यांचे म्हणणे आहे तसेच सदर माहिती उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा निबंधक यांनीही पत्रव्यवहार करूनही अद्यापही माहिती पुरवली जात नसल्यामुळे नेमके जिल्हा उपनिबंधक मोठे कि सहाय्यक निबंधक मोठे याचा शोध घेणे गरजेचे आहे.

**********

# घराच्या बाजूने पाणी सोडल्याने मागासवर्गीय नागरिकांच्या घराला पडल्या भेगा, पंचायत समितीमध्ये आमरण उपोषण

श्रीगोंदा प्रतिनिधी ;- श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी कडेवळीत येथील अनेक मागासवर्गीय लोकांच्या घराच्या बाजूने चर खांदून त्यातून पाणी साचल्याने अनेक मागासवर्गीय लोकांच्या घराला चिरा भेगा पडल्या असून घर कोसळण्याच्या मार्गावर आहे त्यामुळे संबंधित व्यक्तीवर कारवाई करून साचलेले पाणी काढून देऊन आरोग्याच्या समश्या टाळण्यासाठी अनेक मागासवर्गीय नागरिक पंचायत समितीमध्ये उपोषणाला बसले आहेत

श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी कडेवळीत या ठिकाणी वेताळ वस्ती या ठिकाणी अनेक मागासवर्गीय कुटुंबियांचे वास्तव्य आहे ते सर्व घरकुलात राहतात मात्र त्या ठिकाणी विक्रम वाळुंज हा इसम मागासवर्गीय लोकांना जाणीवपूर्वक त्रास देण्याच्या हेतूने पावसाळ्याचे दिवसात त्यांच्या राहत्या घराच्या जवळून मोठा चर खांदून ठेवला आहे त्यामुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या अनेक मागासवर्गीय नागरिकांच्या घराच्या भिंतीला मोठ्या प्रमाणात चिरा अथवा भेगा पडल्या असून त्यामुळे त्यांची घरे कधीही कोसळू शकतात तसेच खांदलेल्या चरामध्ये पावसाचे पाणी साचून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरून मोठ्या प्रमाणात डास निर्माण झाले आहेत त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आरोग्याचा प्रश्न निर्माण



होऊ शकतो सदर बाब गावातील ग्रामसेवक वैशाली शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यांनी कसल्याही प्रकारची दखल घेतली नसल्याचा आरोप उपोषणकर्ते यांनी केला आहे तरी सदर प्रकाराबाबत वरिष्ठ अधिकारी यांनी स्थळनिरीक्षण करून मार्ग काढून मागासवर्गीय नागरिकांना न्याय मिळवून द्यावा तसेच ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी पंचायत समितीच्या प्रांगणात अनेक नागरिक मुलाबाळांसह उपोषणास बसले आहेत यामध्ये संजय भगवान रणसिंग ,महादेव भिकाजी गरुड, भागवत गणपत रणसिंग, अंबादास महादेव गरुड,भाऊसाहेब भागवत रणसिंग,अंकुश महादेव गरुड,सुरेश नामदेव रणसिंग,रमेश नामदेव रणसिंग,भीमराव नंदराम गंगावणे,सुरेखा विशाल कांबळे,नवनाथ गायकवाड आदी नागरिक उपोषणाला बसले आहेत

CODE NO. : MAHMAR51729 (DAILY JANSANJIVANI) |
दैनिक जनसंजीवनी हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक मनिष सुभाष जाधव यांनी प्रतिक गंगणे यांचे श्रीराम आर्ट्स गणेश मंदीर जिल्हा पुणे ४११००९ (महाराष्ट्र) येथे छापुन दैनिक जनसंजीवनी कार्यालय चंद्रनिवारा, टाकळी रोड, कोपरगांव तालुका, कोपरगांव जिल्हा अहमदनगर ४२३६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. सदर अंकात प्रकाशित झालेल्या जाहिरात, लेख, बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद- विवाद कोपरगाव न्याय कक्षेत. संपर्क मोबा. ९८२३७५२९६४
ईमेल : EDITOR.JANSANJIVANIGMAIL.COM

# संगणिकरणाच्या नावाखाली शिधापत्रिकाधारक सुविधेपासून वंचित,सर्व्हर कायमच बंद

श्रीगोंदा प्रतिनिधी :- श्रीगोंदा तालुक्यात ऑनलाईन यंत्रणेच्या किचकट प्रक्रियेमुळे अनेक शिधापत्रिका कार्डधारक शासनाच्या सुविधेपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे शासनाच्या योजनेचा लाभ केवळ ऑनलाईन यंत्रणेच्या कारभारामुळे मिळत नसल्याने सर्वसामान्य गोरगरीब जनतेला शासकीय सुविधा असूनही त्याचा लाभ मिळत नसल्याने सर्वसामान्य जनतेतून प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे नाराजी व्यक्त होत आहे

अहमदनगर जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या व विस्ताराने मोठा म्हणून ओळख असलेल्या श्रीगोंदा तालुक्यात शिधापत्रिका किंवा अन्य शासकीय कामासाठी ऑनलाईन सुविधांचा वापर सुरू झाल्यापासून सातत्याने सर्वसामान्य ग्राहकांना या ऑनलाईनच फटका बसत आहे. त्यातच शासनाच्या शिधापत्रिका व त्यामध्ये होणारे बदल यामध्ये सातत्याने सुधारणा बदल करण्यासाठी ऑनलाईन यंत्रणेचा वापर करावा लागतो. कोणत्याही कार्डधारकाला आपल्या शिधापत्रिकेत नाव वाढवण्याचे असेल तर त्यासाठी ऑनलाईन यंत्रणा ठेवण्यात आली आहे. पण या ऑनलाईन यंत्रणेचे किचकट दहा ते पंधरा निकष असून यांनी निकषातून पात्र झाल्याशिवाय शिधापत्रिका शासकीय कामासाठी उपलब्ध होऊ शकत नाही शिधापत्रिकेच्या माध्यमातून स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळवण्यासाठी तिखट निकष ऑनलाईन यंत्रणा वापरावी लागते. पण सर्वसामान्य ग्राहकाला ऑनलाईन चे सर्वर डाऊनमुळे व पुरवठा विभागाच्या कामकाजामुळे अनेक वेळा शिधापत्रिकाधारकांना शिधापत्रिकेचा कॉलमध्ये नाव असूनही धान्यापासून वंचित राहावे लागत आहे. श्रीगोंदा तालुक्यात लोकसंख्येच्या प्रमाणात विचार करता सरासरी ११५ स्वस्त धान्य दुकान वाटप केंद्रे आहेत. या वाटप केंद्रामध्ये ऑनलाईनच्या घोळामुळे प्रत्येक विभागात किमान शंभर ते दोनशे लोक शिधा पत्रिके पत्रिकेच्या ऑनलाईन यंत्रणेमुळे शासकीय धान्य सुविधांपासून वंचित आहेत. याबाबत स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे तक्रार केली असता संबंधित दुकानदार हे आपण महसूल विभागात तालुका कार्यालयात जाऊन ऑनलाईन सिस्टीममध्ये तुमचे नाव बसवून घ्या, असे सांगतात व तिथून यादी उपलब्ध झाल्यानंतर आपणास धान्य उपलब्ध होऊ शकते.परंतु शासकीय नियम आणि ऑनलाईनचा घोळ यामुळे एकही नवीन नाव शिधापत्रिकेत बसताना मोठ्या अग्निदिव्याचा सामना करावा लागतो. अनेकदा ज्या उपलब्ध माहितीची मागणी केली जाते त्या इतक्या किचकट असतात की त्या पूर्ण करतानाच सामान्य ग्राहकांची पुरेवाट होते. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांना ऑनलाईन यंत्रणेत ऑनलाइन सुविधा तातडीने देऊन त्यांना शासकीय सुविधांचा तातडीने मिळावा, अशी मागणी होत आहे. तहसील कार्यालयाच्या पुरवठा शाखेत गेल्यानंतर तिथे ऑनलाइन यंत्रणेचा घोळ हा सातत्याने ठरलेलाच असतो. याचा त्रास सर्वसामान्यांना होत आहे.

**अद्यापही अनेक लोक धान्याच्या प्रतीक्षेतच!**

ग्रामीण भागात अनेक सर्वसामान्य लोक शिधापत्रिकेवर मिळणार्या धान्यापासून वंचित आहेत. यामध्ये नवीन अपत्य, नव्याने लग्न झालेल्या विवाहित महिलांचा समावेश आहे. या सर्वांची नावे शिधापत्रिकेत येत नसल्याने अनेक लोक धान्यापासून वंचित राहत आहेत. याचा विचार करून त्यांना त्वरित धान्य सुरू करणे गरजेचे आहे.

# 'पल्याड'चे मोशन पोस्टर प्रदर्शित ...

मागील बऱ्याच दिवसांपासून अनेक चित्रपट महोत्सवात पुरस्कार पटकावल्याने चर्चेत आलेला 'पल्याड' हा मराठी चित्रपट प्रदर्शनाच्या वाटेवर आहे. अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं कथानक, समाजाचं वास्तव दाखवणारा ज्वलंत आशय, कसलेल्या कलाकारांचा लक्षवेधी अभिनय आणि विषयाचं गांभीर्य मनावर ठसवणारं कल्पक दिग्दर्शन या आणि अशा बऱ्याच कारणांमुळे 'पल्याड'बाबत उत्सुकता वाढली आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या मोशन पोस्टरने 'पल्याड' बाबतची उत्सुकता आणखी वाढवण्याचं काम केलं आहे. प्रदर्शित झाल्यापासून वाऱ्याच्या वेगानं मोशन पोस्टर जनमानसापर्यंत पोहोचत आहे.




निर्माते पवन सादमवार, सुरज सादमवार, मंगेश दुपारे, प्रणोती पांचाळ आणि शैलेश भीमराव दुपारे यांनी एलिवेट फिल्म्स आणि लावण्यप्रिया आर्टसच्या बॅनरखाली 'पल्याड'ची निर्मिती केली आहे. दिग्दर्शक शैलेश भीमराव दुपारे यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून के सेरा सेरा या डीस्ट्रीब्युशनच्या माध्यमातून येत्या ४ नोव्हेंबरला 'पल्याड' संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. स्मशानजोगी समाजातल्या परिवाराची गोष्ट सांगणाऱ्या 'पल्याड'चं मोशन पोस्टर सर्वार्थानं चित्रपटाची झलक दाखवणारं आहे. हा चित्रपट सत्य प्रथा आणि परंपरेवर आधारीत आहे. आगीचा आगडोंब, जीवाच्या आकांतानं पळणारे माय-लेक, हातात काठ्या घेऊन त्यांच्या मागे धावणारा जनसमुदाय, पुस्तकासोबत विठ्ठल-रुक्मिणीचा फोटो आणि विठ्ठल-विठ्ठल हे वाजणारं गाणं असं चित्र 'पल्याड'च्या मोशन पोस्टरमध्ये पाहायला मिळतं.

'पल्याड'नं आजवर १२ वा दादासाहेब फाळके फिल्म फेस्टिव्हल, नवी दिल्ली, गंगटोक इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, सिक्कीम, अंबरनाथ मराठी फिल्म फेस्टिव्हल, मुंबई, नवी दिल्ली फिल्म फेस्टिव्हल, ब्लॅक स्वान इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, कोलकाता, कोकण मराठी चित्रपट महोत्सव, या चित्रपट महोत्सवांमध्ये विविध पुरस्कार पटकावले आहेत. याखेरीज सिनेक्वेस्ट व्हीआर अँड फिल्म फेस्टिव्हल युएसए, इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ साऊथ एशिया टोरंटो, कॅलेला फिल्म फेस्टिव्हल स्पेन, इंटरनॅशनल कॉस्मोपॉलिटन फिल्म फेस्टिव्हल टोक्यो, एशिया आर्ट फिल्म फेस्टिव्हल हाँगकाँग, बॉयडन इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल स्वीडन आणि रिचमंड इंटरनॅशनल फिल्म फस्टिव्हल युसए मध्ये चित्रपटाची अधिकृत निवड करण्यात आली आहे.

या चित्रपटात शशांक शेंडे, देविका दफ्तरदार, रुचित निनावे, देवेंद्र दोडके, वीरा साथीदार, सायली देठे, गजेश कांबळे, भारत रंगारी, बबिता उइके, रवी धकाते आणि सचिन गिरी आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा सुदर्शन खडांगळे यांनी लिहिली असून, सुदर्शन खडांगळे आणि शैलेश भीमराव दुपारे यांनी पटकथा व संवादलेखन केलं आहे. रवींद्र शालीकराव वांढरे, गौरव कुमार वनिता पाटील, शिवशंकर रवींद्रनाथ निमजे, माया विलास निनावे, लक्ष्मण रवींद्रनाथ निमजे आणि रोशनसिंग बघेल हे सहनिर्माते आहेत. गीतकार प्रशांत मडपुवार आणि अरुण सांगोळे यांनी या चित्रपटासाठी गीतलेखन केलं असून, सॅम ए. आर., जगदीश गोमिला आणि तुषार पारगावकर यांनी स्वरसाज चढवला आहे. अनन्या दुपारे, अवधूत गांधी, शमिका भिडे, सुस्मिरता डावलकर आणि केतन पटवर्धन यांनी आपल्या सुरेल गायनाद्वारे गीतांमधील शब्दांना अचूक न्याय दिला आहे. पार्श्वसंगीत मंगेश धाकडे आणि लोकेश कनिथी यांनी दिलं आहे. डिओपी मोहर माटे यांची सुरेख सिनेमॅटोग्राफी आणि मनीष शिर्के यांनी केलेलं संकलन प्रेक्षकांना भावणारं आहे. स्वप्नील धर्माधिकारी यांनी रंगभूषा केली असून, विकास चहारे यांनी वेशभूषा केली आहे. कला दिग्दर्शन अनिकेत परसावर यांनी केलं आहे, तर गिरीश रामटेके यांनी ध्वनी संयोजनाची बाजू सांभाळली आहे.

# गटविकास अधिकारीच्या लेखी आश्वासनानंतर छावा चे उपोषण स्थगित




राहुरी प्रतिनिधी - घुलेवाडी ग्रामपंचायतच्या गलथान कारभारा विरोधात छावा क्रांतीवीर सेनेचे आमरण उपोषण संगमनेर पंचायत समिती येथे चालु होते यावेळी घुलेवाडी येथील रहिवासी छावा क्रांतीवीर सेनेचे कामगार तालुकाध्यक्ष संदिप राऊत यांनी आमरण उपोषण चालु केले होते त्यांच्या सोबतीला जिल्हाध्यक्ष आशिष कानवडे,महिला आघाडी जिल्हाध्यक्ष राजश्री वाकचौरे,तालुका उपाध्यक्ष सचिन गांजवे,वि.आघाडी तालुकाध्यक्ष लक्ष्मण सातपुते, शेतकरी आघाडी तालुकाध्यक्ष नवनाथ राऊत,तालुका संपर्क प्रमुख गणेश फरगडे,आशिष गवळी,सतीश गोपाळे,दत्ता शिंदे,भागवत कानवडे,सचिन कानवडे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपोषणाची दखल घेण्यासाठी भाजपा चे एक शिष्टमंडळ उपोषण स्थळी पोहचले त्यांनी गटविकास अधिकारी साहेब यांना उपोषण स्थळी बोलवत मध्यस्थी करत ग्रामविकास अधिकारी सुभाष कुटे यांच्या चुका उघडकीस आणुन दिल्या संघटनेच्या उपोषणाच्या इशाऱ्या नंतर ग्रामपंचायत ने मोटर व इतर साहित्य चोरी गेल्याचे पोलीस तक्रार केल्याचे ही गटविकास अधिकारी साहेब यांनीही कबुल केले तसेच जुनी ग्रामपंचायत इमारत चे मटेरियल लिलाव संदर्भात सर्व बाबी तपासुन कारवाई करण्याचे आश्वासन तसेच निवृतसेवा कर्मचारी कामावर तसेच विना परवाना वाहन चालक ग्रामपंचायत वाहने चालवत असल्यास गंभीर दखल घेऊन कारवाई करणे तसेच ऐन वेळी घुलेवाडी ग्रामस्थांनी घेतलेले मुद्दे ही गटविकास अधिकारी यांनी दखल घेत सी सी टीव्ही यंत्रणा गावात कार्यान्वित करणे ,महिला दिन महिला विशेष सभा दंवनडी देऊन घेणे असे अनेक मुद्दे घेतले गेले. यावेळी उपोषण करते आधिक आक्रमक होऊन त्यांचे मुद्दे मांडत ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कारवाई ची मागणी केल्यामुळे भाजपा प्रदेश सद्स्य रविंद्र थोरात,राहुल दिघे,दादाभाऊ गुंजाळ यांनी मध्यस्थी करत १५ दिवसाचे लेखी आश्वासन गटविकास अधिकारी साहेब यांच्याकडून घेत विस्तार अधिकारी कासार साहेब यांचे अध्यक्षतेखाली चौकशी करून आव्हाल सादर करून उचित कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर गटविकास अधिकारी अनिल नागणे साहेब यांच्या हस्ते उपोषण सोडवण्यात आले.

# शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पंचनामे करा – आ. काळे



कोपरगांव प्रतिनिधी – मागील काही दिवसांपासून कोपरगाव तालुक्यातील कोपरगाव, रवंदे, सुरेगाव, दहेगाव, पोहेगाव या पाचही महसूल मंडलातील सर्वच गावांमध्ये सातत्याने अतिवृष्टी होत असल्यामुळे शेतातील सोयाबीन, मका, बाजरी,कांदा रोप आदी उभ्या पिकांचे व फळबागा तसेच भाजीपाला पिकांचे आदी मोठे नुकसान झाले आहे. झालेल्या नुकसानीची गंभीर परिस्थिती पाहता या पिकांचे शेतकऱ्यांच्या बांधावर जावून तातडीने पंचनामे करावे अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी तहसीलदार विजय बोरुडे, गटविकास अधिकारी सचिन सूर्यवंशी व तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांना दिल्या आहेत.

मागील काही दिवसांपासून कोपरगाव तालुक्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होत आहे. कोपरगाव तालुक्याची पावसाची सरासरी ३३६.०५ एवढी असतांना आजवर कोपरगाव तालुक्यात ५२५.२० मी.मी. पाऊस पडला असून हि सरासरी १५६% आहे. यामध्ये सर्वात जास्त पोहेगाव महसूल मंडलात सर्वात जास्त ६४७ मी.मी. म्हणजेच १९२ % तसेच सुरेगाव १८७%, कोपरगाव १३१ %, रवंदे १४३ % व सर्वात कमी दहेगाव मंडलात १२५ % अशा प्रकारे पर्जन्यमान झाले आहे. त्यामुळे अनेक शेतात पाणी मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साचून खरीप पिकांचे मोठ्या प्रमणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे वेळेत पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी महसूल व कृषी विभागाने सर्व नुकसानीचे पंचनामे करावे. पावसामुळे अनेक घरांचे देखील नुकसान झाले असून काही भागात या नैसर्गिक संकटामुळे वीज पडून जनावरे देखील दगावली आहेत. त्यामुळे अगोदरच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ज्याप्रमाणे खरीप पिकांना या अतिवृष्टीचा फटका बसला आहे त्याप्रमाणे फळबागांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आज शेतात पाणी साचले असल्यामुळे सर्व पिके शेतकऱ्यांच्या हातून जाणार आहे. हवामान खात्याकडून अजून काही दिवस पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला असून परतीचा पाऊस बाकी आहे. त्यामुळे या सर्व पिकांचे लवकरात लवकर अचूक पंचनामे होणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचा योग्य मोबदला मिळवून देता येईल. त्यासाठी तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जावून सर्व शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे अचूक पंचनामे करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी दिल्या आहेत.

# बेलवंडीतील चोरीप्रकरणाची राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे तक्रार... साहेब बेलवंडीतील चोऱ्यांचा तपास कधी लागणार– बेलवंडी व्यापारी असोसिएशन




श्रीगोंदा प्रतिनिधी :- गेल्या सहा महिन्यांपासून बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्याचे सुरू झालेले सत्र काही थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. झालेल्या चोऱ्यांपैकी एकाही चोरीचा तपास अजून लागलेला नाही. त्यामुळे पोलीस निरीक्षक नंदकुमार दुधाळ यांच्यासह बेलवंडी पोलिसांच्या कामगिरीवर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.त्यामुळे भारतीय मानव विकास संघाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस संदीप शिंदे यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे बेलवंडीच्या वाढत्या चोरी सत्राची तक्रार केली आहे.

मागील सहा महिन्यांपासून बेलवंडी गाव चोरांनी टार्गेट केले असून आतापर्यंत २० ते २५ चोऱ्या झाल्या असून त्यातील काही तक्रारी दाखल झाल्या तर काही नागरिकांनी तक्रारी दाखल करण्यास घाबरत आहेत. त्यातील एकही चोर पकडण्यात बेलवंडी पोलिसांना अद्याप यश आले नसल्याने जनतेतून अनेक उलतसुलट चर्चांना उधाण आले आहे.

बेलवंडी पोलीस निरीक्षक दुधाळ यांना आतापर्यंत बेलवंडी गावात झालेल्या चोऱ्यांपैकी एकाही चोरीचा छडा लागलेला नाही आरोपी पुन्हा पुन्हा बेलवंडी पोलिसांना आव्हान देऊन बेलवंडी गावातच चोरी करत आहेत. आरोपी वेगळे नसून तेच आरोपी वारंवार बेलवंडी गावात चोरी करत आहेत असे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे. त्याचबरोबर साहेब बेलवंडीतील चोऱ्यांचा तपास कधी लागणार ? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

**पोलीस अधीक्षकांनी लक्ष घालण्याची मागणी..**

मागील ४ महिन्यांपूर्वी एका रात्रीत १० ठिकाणी चोरीतील प्रकरणात कर्जत उपविभागीय पोलिस अधिकारी अण्णासाहेब जाधव यांनी सांगितले होते की आरोपी निष्पन्न झाले असून लवकरच आठ दिवसांत आरोपीना अटक करू असे आश्वासन दिले होते परंतु डीवायएसपी जाधव यांनी दिलेले अश्वासन हवेत गेल्याने आणि बेलवंडी पोलिसांवर जनतेचा विश्वास राहिला नसल्याने याकडे आता जिल्हा पोलीस अधीक्षक मनोज पाटील साहेब यांनी वेळीच लक्ष घातले पाहिजे. अशी मागणी बेलवंडी व्यापारी असोसिएशन करत आहेत.

**बेलवंडी पोलिसांची राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे तक्रार..**

बेलवंडी गावात वारंवार चोऱ्या होऊन देखील एक पण चोर पोलीसांना सापडत नाही चोरी, दरोडा यात एखादा बळी गेल्यास त्यास जबाबदार कोण? असा सवाल भारतीय मानव विकास सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष संदीप शिंदे यांनी केला आहे. तसेच एका पोलीस कर्मचाऱ्याने विनाकारण बेलवंडी येथील एका सर्वसामान्य व्यवसायिकास त्रास दिल्याची तक्रार शिंदे यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

# अहमदनगर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त जागा भराव्यात – परजणे




कोपरगांव प्रतिनिधी – अहमदनगर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील तसेच कोपरगांव येथील वळुमाता प्रक्षेत्र कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी वर्गाची अनेक पदे सद्या रिक्त असल्याने गोपालकांना तसेच शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या अडचणी विचारात घेऊन या रिक्त जागा तातडीने भराव्यात अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे पाटील यांनी केली.

यासंदर्भात श्री परजणे पाटील यांनी राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकासमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्र पाठविले असून त्यात म्हटले आहे की, अहमदनगर जिल्ह्यात राज्यस्तरावरील सहाय्यक आयुक्त पदाच्या चार जागा, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदाच्या तीन जागा तर पशुधन पर्यवेक्षक पदाच्या दोन जागा सद्या रिक्त आहेत. तसेच अहमदनगर जिल्हा परिषद स्तरावरील पशुधन विकास अधिकारी पदाच्या सात जागा, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदाची एक जागा तर पशुधन पर्यवेक्षक पदाच्या ४३ जागा सद्या रिक्त आहेत.

याशिवाय पशुसंवर्धन विभागांतर्गत असलेल्या कोपरगांव येथील वळुमाता प्रक्षेत्र कार्यालयामध्ये राज्यस्तरावरील सहाय्यक आयुक्त पदाची एक जागा. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदाच्या दोन जागा, सहाय्यक वैरणविकास अधिकारी पदाची एक जागा. चालक पदाची एक जागा तर कनिष्ठ लिपीक पदाची एक जागा सद्या रिक्त आहे. रिक्त असलेल्या जागांमुळे संबंधित विभागातील कामकाजावर विपरीत परिणाम होत असून या दोन्हीही विभागांशी संबंधीत गोपालक व शेतकरी वर्गामधून नाराजी दिसून येत आहे. कार्यालयात संबंधित अधिकारी वर्ग व कर्मचारी कमी असल्याने जनावरांसाठी असलेल्या शासकीय सुविधा, वैद्यकीय सेवा वेळेवर उपलब्ध करुन देण्यास अनेक अडचणी येतात. मुळात अहमदनगर जिल्हा हा महाराष्ट्रात दुग्धोत्पादनात अग्रेसर असलेला जिल्हा आहे. जिल्ह्यात दुधाळ पशुधनाची संख्याही मोठी आहे. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावरच अवलंबून आहे. अशा परिस्थितीत गोपालकांना वेळेवर सुविधा उपलब्ध होत नसल्याने अनेक संकटाचा सामना त्यांना करावा लागत आहे. ही गंभिर समस्या विचारात घेऊन व दूध उत्पादक शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने अहमदनगर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त जागा तातडीने भराव्यात. त्यासाठी संबंधित विभागास आपले निर्देश व्हावेत अशीही मागणी श्री परजणे यांनी ना. विखे पाटील यांना पाठविलेल्या पत्रातून केली आहे.

# मुंबईत मोठ्या जल्लोषात लाँच झाला हृतिक रोशन आणि सैफ अली खान अभिनीत 'विक्रम वेधा'चा ट्रेलर!

दिग्दर्शक पुष्कर आणि गायत्री यांचा बहुप्रतिक्षीत चित्रपट 'विक्रम वेधा'चा ट्रेलर आज कलाकारांच्या हस्ते मुंबईतील विशेष कार्यक्रमात औपचारिकरीत्या लाँच करण्यात आला.



औपचारिक प्रक्षेपणाची तयारी करत 'विक्रम वेधा'च्या निर्मात्यांनी काल कलाकारांच्या चाहत्यांसाठी दुबईसह देशभरातील १० शहरांमध्ये एका विशेष प्रिव्ह्यूचे आयोजन केले होते. अशा प्रकारे चित्रपट प्रमोट करण्यासाठी पुढाकार घेत भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात पहिल्यांदाच असा उपक्रम राबवण्यात आला आहे. यामुळे एक दिवस अगोदरच या चित्रपटाचा जोरदार प्रचार होण्यास मदत झाली असून, टीझरच्या प्रचंड यशानंतर अपेक्षाही वाढल्या आहेत.

'विक्रम वेधा'च्या ट्रेलरवर टाळ्या आणि शिट्ट्यांचा वर्षाव होत असून, शहरी भागांसोबतच सोशल मीडियावर अविश्वसनीय प्रेम आणि कौतुक होत आहे. 'विक्रम वेधा'मध्ये अनुक्रमे सैफ अली खान आणि हृतिक रोशन विक्रम आणि वेधा यांच्या मुख्य भूमिकेत आहेत. सैफ अली खान विक्रमच्या भूमिकेत एका सरळमार्गी शूटिंग पोलिसाच्या व्यक्तिरेखेत जीव ओतताना दिसणार आहे, तर वेधा नावाच्या गुंडाच्या भूमिकेत हृतिक रोशन आहे.

हृतिक रोशन आणि सैफ अली खान यांना त्यांच्या ट्रेलरमधील परफॉर्मन्ससाठी प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटात रोहित सराफ, योगिता बिहानी, शरीब हाश्मी आणि सत्यदीप मिश्रा हे कलाकारही महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

'विक्रम वेधा' या ॲक्शन-थ्रीलरचे लेखन आणि दिग्दर्शन पुष्कर-गायत्री यांनी केलं आहे. 'विक्रम वेधा'ची स्टोरी वेगवेगळ्या नाट्यमय वळणांनी भरलेली असून, एक कठोर पोलीस असलेला विक्रम (सैफ अली खान) खतरनाक गुंड वेधा (हृतिक रोशन) चा माग काढण्यासाठी आणि त्याचा पाठलाग करण्यासाठी निघाल्याचं पहायला मिळणार आहे. चोर-पोलिसांच्या या पाठशिवणीच्या खेळात वेधा प्रमुख कथाकाराच्या रूपात कथांच्या मालिकेद्वारे विक्रमला विचार प्रवृत्त करून नैतिक संदिग्धता सोडवण्यास मदत करतो.




'विक्रम वेधा'ची प्रस्तुती गुलशन कुमार, टी-सिरीज आणि रिलायन्स एंटरटेनमेंट यांच्या सहयोगाने फ्रायडे फिल्मवर्क, जिओ स्टुडिओज आणि वायनॉट स्टुडिओज प्रोडक्शनने केली आहे. या सिनेमाचे दिग्दर्शन पुष्कर आणि गायत्री यांनी केले असून, भूषण कुमार, एस. शशिकांत आणि रिलायन्स एंटरटेनमेंट यांनी निर्मिती केली आहे. 'विक्रम वेधा' हा चित्रपट ३० सप्टेंबर रोजी संपूर्ण जगभर रिलीज होणार आहे.

*****************